अत्यंत महत्वाचे व तातडीचे

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हीसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

## (सामान्य प्रशासन विभाग)

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी-पॉईंट मार्ग, नागपूर – ४४० ०३३
दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२९५६३०२ ई–मेल: arga@nagpuruniversity.nic.in

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०/स/२९३४
दिनांक : १३ एप्रिल २०२०

## परिपत्रक

**विषय: राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

संदर्भ: १. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य–५, दिनांक १४ मार्च २०२०.

२. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक संकिर्ण–२०२०/(सं.क्र.११४/२०/ विशि–१, दिनांक १४ मार्च २०२०.

३. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक उशिस/कोरोना/मवि–१/ २०२०/३७७८, दिनांक १४ मार्च २०२०.

४. विद्यापीठाचे दिनांक १५ मार्च २०२० रोजीचे पत्र क्रमांक रातुमनावि/साप्र/२०/स/२९१९.

५. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दिनांक १६ मार्च २०२० रोजीचे पत्र क्रमांक संकीर्ण–२०२०/ प्र.क्र.६०/२०/तांशि–१.

६. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक १६ मार्च २०२० रोजीचे पत्र क्रमांक उशिस/ कोरोना/मवि–१/२०२०/३८१९.

७. विद्यापीठाचे दिनांक २१ मार्च २०२० रोजीचे पत्र क्रमांक रातुमनावि/साप्र/२०/स/२९९५.

८. विद्यापीठ अनुदान आयोगाचे दिनांक २१ मार्च २०२० रोजीचे पत्र क्रमांक F.No.1-14/2020 (Website).

९. सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक २३ मार्च २०२० रोजीचे पत्र क्रमांक उशिसं/ कोरोना/मवि–१/२०२०/३८१९/४०४२.

१०. भारत सरकारच्या गृहविभागाचे पत्र क्रमांक ४०–३/२०२०-DM-I(A), दिनांक २४ मार्च २०२०.

११. महाराष्ट्र शासनाच्या महसूल, वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाचे पत्र क्रमांक DMU/२०२०/ CR.92/DisM-1, दिनांक २५ मार्च २०२०.

१२. महाराष्ट्र शासनाच्या Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai द्वारे निर्गमित अधिसूचना क्रमांक DMU/2020/C-92/DisM-I, dated 13th April.

केंद्र शासन, राज्य शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे सर्व शैक्षणिक विभाग, संचालित व संलग्नित महाविद्यालये आणि सर्व प्रशासकीय कार्यालयांना कोरोना विषाणूच्या प्रसारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे व परिपत्रकांमधील दिशानिर्देशांचे तंतोतंत पालन करण्याचे आणि विद्यापीठातील व संलग्नित व संचालित सर्व महाविद्यालयांमधील शिक्षक, संशोधक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी दिनांक २३ मार्च २०२० ते १४ एप्रिल २०२० या कालावधीत आपल्या घरी राहून (Work from Home) संबंधित विभागाचे कामकाज करण्याचे सूचित करण्यात आले होते.

विद्यापीठाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांना जोडून आता यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai द्वारे निर्गमित संदर्भिय अधिसूचना क्रमांक १२ ला अनुसरून सर्व संबंधितांना मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, कोरोना विषाणूचे वाढते संक्रमण रोखण्यासाठी वर नमूद केलेला कालावधी **दिनांक ३० एप्रिल २०२० पर्यंत वाढविण्यात येत आहे. त्यानुसार** विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील व संचालीत व संलग्नित महाविद्यालयातील सर्व शिक्षक, संशोधक व शिक्षकेतर कर्मचारी आणि प्रशासकीय विभागातील सर्व अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपल्या **घरी राहून (Work from Home) संबंधित विभागाचे कामकाज करावे.** तसेच याबाबत केंद्रशासन, राज्य शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार **विद्यापीठाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांमधील सूचनांचे तंतोतंत पालन करणे सर्व संबंधितांना बंधनकारक राहील.** त्याचप्रमाणे कोणत्याही अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजासाठी संबधित शिक्षक/संशोधक/शिक्षकेतर कर्मचारी यांना वरिष्ठांनी कार्यालयात बोलाविल्यास त्यांना कार्यालयात त्वरित हजर व्हावे लागेल, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. नीरज खटी)
प्रभारी कुलसचिव

प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेषित :

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयाचे सर्व प्राचार्य व संचालक.
३. विद्यापीठाच्या सर्व वसतिगृहाचे अधीक्षक.
४. विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखा प्रमुख.

यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रकानुसार आपल्या स्तरावर आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(प्रदीप बिनीवाले)
उपकुलसचिव (सा.प्र.)
अति. प्रभार